चार सांघिक विजेतेपदांसह महावितरणचे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत एकतर्फी वर्चस्व

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेचा समारोप

पुणे, दि. ९ मे २०२६: एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या वतीने आयोजित अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय स्पर्धेत महिला पुरुष गटातील कबड्डी व खो-खो तसेच कुस्तीमध्ये महावितरणने तब्बल चार सांघिक विजेतेपद व एक उपविजेते पद मिळवत एकतर्फी वर्चस्व राखले. बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशभरातली विद्युत कंपन्यांच्या तीन दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेचा शुक्रवारी (दि. ८) सायंकाळी समारोप झाला. दरम्यान, महावितरणच्या कबड्डी पुरुष संघाने बलाढ्य हिमाचल प्रदेश संघाचा अटीतटीच्या अंतिम सामन्यात पराभव करीत १५ वर्षांनंतर विजेतेपदाचा मान मिळवला.

या राष्ट्रीय स्पर्धेतील सर्व सांघिक व वैयक्तिक विजेत्यांना करंडक व प्रशस्तिपत्राने गौरविण्यात आले. बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रेय पडळकर (महापारेषण), कोकणचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे (महावितरण), स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष व पुणे प्रादेशिक संचालक श्री. सुनील काकडे (महावितरण), मुख्य अभियंते सर्वश्री अनिल कोलप, दत्तात्रेय बनसोडे, धर्मराज पेठकर, स्वप्निल काटकर, अंकुर कावळे, संजय पाटील, संजय कुऱ्हाडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके व श्री. पुरुषोत्तम वारजुरकर, विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. जिग्नेश राय, सरचिटणीस श्री. नरेश कुमार, खजीनदार श्री. ललित गायकवाड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पांडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष पाटणी, भक्ती जोशी, सोनाली बाविस्कर, स्वागती सोळंकुरे यांनी केले तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भुपेंद्र वाघमारे यांनी मानले. पुढील वर्षापासून कुस्ती स्पर्धेसाठी महिला गटाचा समावेश करण्याचा निर्णय यावेळी नियंत्रण मंडळाच्या वतीने जाहीर करण्यात आला.



कबड्डीच्या विजेचेपदाचे महावितरणकडून स्वप्न साकार – अत्यंत चुरशीच्या उपांत्य फेरीमध्ये प्रतिस्पर्धी संघावर मात करीत मागील वर्षीचा विजेता हिमाचल प्रदेश विरुद्ध महावितरण संघ यंदाही आमनेसामने आले. दोन्ही संघात राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग असल्याने अंतिम सामन्यासाठी क्रीडा प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली. सामन्याच्या पहिल्या

पाच ते सात मिनिटात हिमाचल प्रदेशने आक्रमक चढाईवर भर देत ६ विरुद्ध २ अशी आघाडी घेतली. सर्व गडी बाद झाल्यानंतर कोर्टात एकमेव असलेल्या महावितरणच्या नीलेश ठाकूर याने आक्रमक चढाईत हिमाचल प्रदेशच्या दोन खेळाडूंना बाद केले. तर लगेचच विरोधी चढाई करणाऱ्या हिमाचल प्रदेशचा मातब्बर रामगोपालला महावितरणच्या तीन बचावपटूंनी बाद केले आणि याच ठिकाणी सामना फिरला.

त्यानंतर हिमाचल प्रदेशने आक्रमक चढाईऐवजी सावध व बचावात्मक पवित्रा स्विकारला. तोच पवित्रा स्वीकारून महावितरणकडून कर्णधार अमित जाधव, अभिषेक नर, अजय शिंदे, रजत गोमासे, रोहित जिवतोडे, नीतेश पोवार, प्रतिक मुरकुटे, दीपक माने यांनी बचावात्मक फळीला आणखी आक्रमक बनवले. हिमाचल प्रदेशच्या गुरूमीत, अभिनंदन, हेमराज, मनीष कुमार, गुरुविंदर या बलाढ्य चढाईपटूंना बाद करीत सामन्यावर पकड मिळविली. मध्यंतरापर्यंत महावितरण संघ १७ विरुद्ध १३ गुणांनी आघाडीवर होता. अत्यंत चुरशीच्या व रंगतदार सामन्यात अखेर महावितरणने ३४ विरुद्ध २४ गुणांनी बलाढ्य हिमाचल प्रदेशवर मात केली व या राष्ट्रीय स्पर्धेत १५ वर्षांनंतर कबड्डीमध्ये विजेतेपद मिळवले. यात संघाचे प्रशिक्षक नीलेश नाईक व व्यवस्थापक श्री. रामगोपाल अहिर यांचेही योगदान महत्वाचे ठरले. कबड्डीच्या महिला गटात देखील महावितरण विरुद्ध हिमाचल प्रदेश अशी लढत झाली. मात्र हिमाचल प्रदेशने सुरवातीला घेतलेली आघाडी कायम ठेवत महावितरणचा २१ विरुद्ध १२ गुणांनी पराभव केला. त्यामुळे महावितरणच्या महिला कबड्डी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

फोटो नेम - AIESCB Final Kabaddi 09-05-2026

फोटो नेम - बालेवाडी येथील विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या सांघिक विजेत्या व उपविजेत्या संघातील खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपत्राने संचालक श्री. दत्तात्रेय पडळकर यांच्याहस्ते गौरविण्यात आले. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक श्री. दिलीप जगदाळे, आयोजन समितीचे अध्यक्ष श्री. सुनील काकडे, उपाध्यक्ष श्री. अनिल कोलप आदींची उपस्थिती होती.